# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई

दूरध्वनी क्र. :२४०१०४३७/२४०२०७८१
२४०१४७०१
फॅक्स क्र. : २४०२४०६८
*Visit us at* : http://mpcb.gov.in
Email:mpcb@gov.in

कल्पतरु पाईंट, २ रा मजला,
सायन-माटुंगा स्किम मार्ग क्र ८,
सायन सर्कल समोर, सायन (पूर्व)
मुंबई:- ४०० ०२२.

जा.क्र.मप्रनि/आस्था/ब्र-६९२ दिनांक ८ / ४ /२०१३

## कार्यालयीन आदेश क्रमांक ई- ५८/२०१३

विषय: महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातील अधिकारी/कर्मचारी यांना सेवानिवृत्ती उपदान योजना लागू करण्याबाबत

संदर्भ: १. शासन निर्णय, पर्यावरण विभाग क्रमांक मप्रनि/१०९१/७२०/ प्र.क्र.९४/का-३, दिनांक २९/०८/१९९१

२. मंडळाचे परिपत्रक क्र. मप्रनि/लेशा/२४५४, दि. १७/०९/१९९१

३. मंडळाच्या दिनांक १५/१०/२००९ रोजी झालेल्या १४९ व्या बैठकीचे इतिवृत्त (बाब क्रमांक १ )

४. दि. १८/०२/२०१३ रोजी झालेल्या मंडळाच्या १५९ व्या बैठकीचे इतिवृत्त

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातील अधिकारी/कर्मचारी यांना संदर्भ क्रमांक १ अनुसार सेवानिवृत्ती उपरांत सेवा उपदान योजना लागू करण्यात आली असून, शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) १९८२ मधील नियम ११० व १११ मधील तरतुदी मंडळातील अधिकारी व कर्मचारी यांना लागू करण्यात आल्या आहेत.

मंडळाच्या १५९ व्या बैठकीमध्ये मंडळातील अधिकारी/कर्मचारी यांना राजीनाम्याने सेवासमाप्ती उपरांत सेवा उपदान प्रदान करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर बैठकीमधील निर्णयानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) १९८२ मधील नियम ११० नुसार ज्या कर्मचाऱ्यांची अर्हताकारी सेवा सलग ५ वर्षाहून कमी झालेली नाही, अशा कर्मचाऱ्यांची नियतवयोमानाने/सेवानिवृत्तीने/राजीनाम्याने/अपंगत्वाने/पूर्ण रुग्णतेने सेवा समाप्त झाली आहे, अशा कर्मचाऱ्यांना सेवा उपदान अनुज्ञेय राहील तसेच एखादया अधिकारी/कर्मचाऱ्याची सेवा मृत्युने समाप्त झाली असेल तर त्यांना सदर ५ वर्षाच्या अर्हताकारी सेवेच्या कालावधीची अट लागू असणार नाही. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) १९८२ मधील नियम ११० व १११ मध्ये नियम ६४ ते ६६ मधील व्याख्या संदर्भांकित करण्यात आल्यामुळे, सदर नियमातील तरतुदीनुसार मंडळातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना सेवा उपदान योजनेच्या तरतुदी लागू करण्यात येत आहेत.

२/-

तसेच उपदान वेतन कायदा १९७२ मधील तरतुदीनुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) १९८२ मधील नियम ११० व १११ नुसार अधिकारी/कर्मचारी यांनी ५ वर्षाची अर्हताकारी सेवा पूर्ण केल्यावर नियतवयोमानाने सेवानिवृत्ती/राजीनाम्याने/मृत्युने/अपंगत्वाने-पूर्ण रुग्णतेने सेवा समाप्त झालेल्या मंडळातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना सेवा उपदान अनुज्ञेय राहील.

सदर आदेश दिनांक १५/१०/२००९ पासून अंमलात येत आहेत.

( राजीव कुमार मित्तल, भा.प्र.से.)
सदस्य सचिव

प्रत माहितीसाठी-
१. प्रधान वैज्ञानिक अधिकारी /जल प्रदूषण निवारण अभियंता/हवा प्रदूषण निवारण अभियंता
२. सहायक सचिव (तांत्रिक)/वरिष्ठ विधी अधिकारी, विधी व योजना विभाग
३. वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी/कार्यकारी अभियंता म. प्र. नि. मंडळ, मुंबई
४. वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी,मध्यवर्ती प्रयोगशाळा,निर्मलभवन,महापे, नवी मुंबई/औरंगाबाद
५. प्रादेशिक अधिकारी, मुख्यालय/मुंबई/ठाणे/कल्याण/रायगड/नवीमुंबई/पूणे/नशिक/नागपूर औरंगाबाद/कोल्हापूर/अमरावती/चंद्रपूर
६.उप-प्रादेशिक अधिकारी, मुंबई-१/मुंबई-२/मुंबई-३/मुंबई-४/ठाणे-१/ठाणे-२/तारापूर-१/तारापूर-२/ नवी मुंबई-१/नवीमुंबई-२/तळोजा/कल्याण-१/कल्याण-२/कल्याण-३/भिवंडी/रायगड-१/रायगड-२/ /महाड/कोल्हापूर/सांगली/रत्नागिरी/चिपळूण/पूणे-१/पूणे-२/पिंपरी-चिंचवड/सातारा/सोलापूर/ औरंगाबाद-१/औरंगाबाद-२/औरंगाबाद-३/नांदेड/नाशिक/अहमदनगर/जळगाव-१/जळगाव-२/ नागपूर-१/नागपूर-२/नागपूर-३/चंद्रपूर/अमरावती-१/अमरावती-२/अकोला/परभणी/लातूर/भंडारा.
७.वैज्ञानिक अधिकारी,प्रादेशिक प्रयोगशाळा, नागपूर/नाशिक/पूणे/औरंगाबाद/चिपळूण/ठाणे/चंद्रपूर
८. सांख्यिकी अधिकारी/ सहायक लेखा अधिकारी,उपकरशाखा/जनसंपर्क अधिकारी/भांडार अधीक्षक
९. संकेतस्थळ, पर्यावरण माहिती केंद्र, म. प्र. नि. मंडळ, मुंबई
१०. कार्यालयीन आदेश नस्ती- २०१३